# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 31/05/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 8 कि.मी अंतरावर धामनगाव येथे दि. 29/05/2021 चे 17.00 वा. ते दि. 30/05/2021 चे 10.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– शेख दानिस रियाज वय 33 वर्षे रा. हाउस नं. 482, भिवंडी, ठाणे, जि. ठाणे यांचे के. एन. इंटरनॅशनल प्रा.लिमीटेड या कंपनीचे एन.टी.पी. सी. ॲस डाईक येथे काम सुरू असून धामनगाव येथे स्टॉपचे राहण्याकरीता क्वॉर्टर आहेत व त्याचे बाजूला स्टोअर रूम तयार कलेले असून त्यामध्ये ठेवलेला 1. एक्साईट कंपनीचे बॅटरी 12 नग कि. 20,000/–रु, 2. डोजरला लागणारा चैन व्हिल 18 नग कि. 48,000/–रु, 3. दोन ताळपत्री कि. 500/–रु, व डिझल पंप किं. 4,000/–रु. असा एकुण 72,500/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ ठाकूर मो.नं. 7083151993 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 30/05/2021 चे 02.00 वा. ते 02.30 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन भाची हि लहानपणा पासुनच फिर्यादीकडे राहत असून घटना तारखेला पीडिता हि फिर्यादीची आई हिच्या जवळ झोपली असता फिर्यादीच्या आईला रात्री 02.30 वा दार उघडण्याचा आवाज आला व अंथरूणावर ती दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या भाचीला कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण 9545363121 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावरील रूईखैरी शिवार नॅशनल हायवे रोड नागपूर येथे दिनांक 30/05/2021 चे 18:00 वा. दरम्यान युपी– 15/बीटी– 5931 क्रमांकाचा ट्रॅकरचा चालक/मृतक नामे– यशविसिंग गुलाबसिंग, वय 51 वर्ष, रा. महात्मा फुले नगर, मेरठ यु. पी हा जलसा ढाबा येथे जेवन करीत होता. त्याने त्याचा मोबाईल फोन चार्जिंगला लावुन ठेवला होता. त्यादरम्यान ट्रॅकरचा चालक याने आपला ट्रॅकर हैद्राबाद कडे घेवुन जात असतांना थोडयाच अंतरावर त्याचे लक्षात आले की, ''आपण आपला मोबाईल फोन ढाब्यावरच विसरलो'' करिता तो मोबाईल फोन घेण्यासाठी ढाब्याकडे परत येत असतांना त्यास अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन धडक मारूण त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने अज्ञात वाहन चालकाविरूध्द सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजयविज श्रीसुंदरलाल विज, वय 63 वर्ष, रा. घर क्र 247, देवपुरी मेरठ ठाणा, रेल्वे रोड जि. मेरठ युपी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी पाथोडे मो.क्र 7875685125 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर